RNI No. MAHBIL/2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक ४] बुधवार, जानेवारी १३, २०२१/पौष २३, शके १९४२ [ पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

## असाधारण क्रमांक ७

## प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा (भूसंपादन शाखा)

### “भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३” चे कलम २५ खाली अधिसूचना

क्रमांक उपजिभूक्र. ४/भूसं/एलएक्यू/एसआर२-२७२/मुंउजि/२०२१.—मौजे गोरेगाव, तालुका बोरीवली, जिल्हा मुंबई उपनगर येथील “भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३” अंतर्गत न.भू.क्र. ६०/६ (पै.) चे भूसंपादन.

ज्याअर्थी, मौजे गोरेगाव, तालुका बोरीवली येथील न.भू.क्र. ६०/६ (पै.) या जमिनीचे ३०३.०० चौ.मी. क्षेत्र “३५.०० मी रुंद विहीत रस्ता” करीता संपादन करणेचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाला असून प्रकरणी भूसंपादनाची कार्यवाही करणेकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक १४ जानेवारी २०१९ रोजीचे आदेशान्वये उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्रमांक ४, मुंबई उपनगर जिल्हा यांना प्राधिकृत केले आहे. प्रकरणी कलम ११ ची अधिसूचना दिनांक १८ जून २०१९ रोजी व कलम १९(१) ची अधिसूचना दिनांक १४ जानेवारी २०२० रोजी प्रसिद्ध झाली.

आणि ज्याअर्थी, भूमी संपादन अधिनियम, २०१३ चे कलम २५ मधाल परंतुकान्वये जिल्हाधिकारी कलम १९ अन्वये घोषणा प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून १२ महिन्याच्या कालावधीत निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर, जमीन संपादनाची संपूर्ण कार्यवाही निवाडा रद्द होईल; परंतु त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, समुचित शासनाला १२ महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल.

आणि, ज्याअर्थी, कोरोना महामारीमुळे व इतर प्रशासकीय कारणामुळे झालेल्या विलंबामुळे सदर प्रकरणात पुढील कार्यवाही करता आलेली नाही. तरी कलम १९(१) ची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १२ महिन्याच्या कालावधीत म्हणजेच दिनांक १३ जानेवारी २०२१ पर्यत निवाडा जाहीर करणे शक्य नाही. प्रकरणी सद्य:स्थितीत सदर निवाडा जाहीर करणेस वाढीव मुदत न दिल्यामुळे जर हा निवाडा रद्द झाला तर सदर प्रकरणात पुन्हा कलम ११ व १९ ची अधिसूचना प्रसिद्धी, संयुक्त मोजणी, प्रारूप निवाडा, अंतिम निवाडा ही कार्यवाही करणेसाठी वेळ जाऊन शासनाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअर्थी, उपरोक्त कलम २५ च्या अधिसूचनेद्वारे प्राप्त वाढीव कालावधीच्या मुदतीस झालेल्या विलंबास समर्थन करणारी परिस्थिती असून सदर मुदतीत निवाडा करणे शक्य नसल्याची माझी खात्री झाली असून समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, या नात्याने प्रकरणात १२ महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा असलेला अधिकार वापरून खालील प्रकरणातील अंतिम निवाडा पारित करण्यास १२ (बारा) महिन्यांची वाढीव मुदत मंजूर करत आहे.

**अनुसूची-एक जमिनीचे वर्णन**

मौजे गोरेगाव, तालुका बोरीवली, जिल्हा मुंबई उपनगर

| अ. क्र. | न.भ.क्र. | जमिनीचे आवश्यक क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|
| १. | ६०/६ (पै.) | ३०३.०० |

**संपादनाचे प्रयोजन.—**“३५.०० मी. रुंद विहीत रस्ता” करीता संपादन.

**मिलिंद बोरीकर,**
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

ठिकाण : मुंबई
दिनांक १३ जानेवारी २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.